॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

जनसंपर्क कार्यालय (PUBLIC RELATIONS OFFICE)

Phone: (02462) 229325 Website: www.srtmun.ac.in E-mail: srtmunpro1@gmail.com

संदर्भ क्र.: ज.का./२०२१-२२/७२ दि.०८/०७/२०२१

## विद्यापीठात 'कोव्हीड-१९ प्रतिबंध' व्याख्यानमाला

कोरोना काळात आपल्याला अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. या आव्हानांचा सामना करताना अनेकांचे मानसिक खच्चीकरण झाले आहे. या काळात आपले मनोबल उंचाविण्यासाठी 'कोव्हीड-१९ प्रतिबंध' ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन विद्यापीठाच्या भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल आणि शिक्षणशास्त्र संकुल यांच्या वतीने करण्यात येत आहे. या आपत्तीबाबत समाजातील सर्व घटकांना मार्गदर्शन व्हावे, या हेतूने ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत आहे. दि. १० जुलै ते ७ ऑगस्ट दरम्यान येणाऱ्या प्रत्येक शनिवारी सायंकाळी ५ ते ८ वा. सदर व्याख्यानमाला ऑनलाईन होणार आहे. अशी माहिती स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे यांनी दिली आहे.

गेल्या पंधरा महिन्यांपासून महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील प्रत्यक्ष वर्गखोलीमधील अध्यापन बंद आहे. विद्यार्थ्यांचे अध्ययन, परीक्षा आणि इतर शैक्षणिक उपक्रम हे ऑनलाईन पद्धतीने सुरू असले तरी यातून अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. विद्यार्थी वर्गाला नैराश्येने ग्रासलेले आहे. त्यांचे कुटुंबीय, मित्र,आप्तेष्ट यांच्यावरही या महामारीचा विपरीत परिणाम झालेला आहे. ही व्याख्यानमाला विद्यार्थी, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी; संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य व शिक्षकेतर कर्मचारी तसेच नागरिक यांच्यासाठी असेल.

आपला समकाळ आणि भोवताल एका संकटातून जात असताना वैज्ञानिक पद्धतीने आपण या काळाला समजून घेतलं पाहिजे आणि संवेदनशीलपणे व निर्धाराने या काळातील समस्यांचा सामना केला पाहिजे. हे मनोबल आपल्याला मिळावे, यासाठी या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे. अशी माहिती व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. दिलीप चव्हाण यांनी दिली.

या व्याख्यानमालेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते होणार आहे. तर समारोपाचे प्रमुख पाहुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे असणार आहेत. व्याख्यानमालेसाठी पाच तज्ज्ञांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये दोन वैद्यकीय व्यायसायिक, एक मानसोपचारतज्ज्ञ, एक मानसशास्त्रज्ञ आणि एक शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश आहे. या व्याख्यानमालेत डॉ. सचिन सरोदे, डॉ. शीतल चव्हाण, डॉ. रवीन्द्र नरोड, डॉ. प्रीतमकुमार बेदरकर, किशोर दरक यांची विविध विषयांवर व्याख्याने होणार आहेत. व्याख्यानमालेविषयी अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सदरील व्याख्यानमाला ही ऑनलाईन पद्धतीने होणार असून या व्याख्यानमालेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शैलजा वाडीकर आणि डॉ. चंद्रकांत बाविस्कर या संकुल संचालकांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी,
दैनिक/इलेक्ट्रॉनिक मेडिया/सामाजिक संपर्क माध्यम,
सप्रेम नमस्कार,
मान्यवर/ महोदय,
उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

जनसंपर्क अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.